**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ६ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – नवनाथ दत्तू पानसरे, वय – ४२ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – पानसरवाडी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –</u>**

१. घटना दि. ०९.०७.२०१७ रोजी रात्री १२:०० वाजताच्या दरम्यान अकोले येथील बाजारतळाजवळ घडली होती. त्या दिवशी मी जेवण करून तेथे उभा होतो. शाम शेटे, शाहरूख शेख, अमोल अशोक गायकवाड हे माझे मित्र असून आम्ही सर्वजण तेथे उभे होतो. राजूरकडून येणारी मारूती सुझुकीची झेन गाडी जिचा नोंदणी क्रमांक एम.एच १२ सी.ए. ३४५९ ही भरधाव वेगाने आली व त्या तिघांना जोराची धडक दिली. त्यात शाम शेटे आणि शाहरूख शेख किरकोळ दुखापत होवून अमोल अशोक गायकवाड हा बेशुध्द होवून काहीही हालचाल करत नव्हता. धडक देणारी गाडी निघून गेली. मी त्या गाडीचा पाठलाग केला व ड्रायव्हर सचिन कुदळ हा गाडी चालवत होता. आम्ही त्याचा पाठलाग करत असताना त्याने गाडी आमच्या पासून फास्ट नेवून शेटेवाडी शिवारात शेतामध्ये लावली व पळून गेला.

२. अमोल गायकवाड यास सरकारी दवाखाण्यात नेले. तेथून त्यास नगर येथे नेले. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. मी आरोपी सचिन कुदळ यास ओळखतो. तो न्यायालयात हजर आहे.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती. एस. बी. नवले यांच्या मार्फत</u>

३. दिनांक ०९.०७.२०१७ रोजी अमावश्या होती. हे म्हणणे खरे आहे की, अमावश्या असल्यामुळे बाजारतळाजवळ अंधार होता. बाजारतळाचे गेट व पार्वती मेडिकल मधील अंतर १०० फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वेळी अपघात घडला त्यावेळी गाडी कोण चालवत होते हे मला दिसले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळी गाडीचा पाठलाग केला व गाडी सापडली त्यावेळी गाडीचा चालक तेथे आम्हाला मिळून आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे नाव आम्हाला पोलीसांकडून कळाले. साक्षीदार सांगतो की, गाडी चालवणारा माणूस आरोपीच होता.

४. हे म्हणणे खरे आहे की, शाम शेटे, शाहरूख शेख व अमोल गायकवाड हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.08.11 18:22:20 +0530

दिनांक ११.०८.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले